राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

सूचना का अधिकार

पिनॅकल मॉल, चौथा मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ,

जुना आग्रा रोड, नाशिक ४२२ ००२.

Website- www.sic.maharashtra.gov.in

दूरध्वनी क्र. ०२५३-२२३२७६४ ई-मेल - sicnashik@gmail.com

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १८ अंतर्गत दाखल तक्रार

क्र.रामाआ/तक्रार/५९७/२०२३/अहिल्यानगर

तक्रारदार	प्रतिवादी	
	जन माहिती अधिकारी	प्रथम अपिलीय अधिकारी
श्री.महादेव अरुण साठे, रा.मु.पो.नान्नज, ता.जामखेड, जि.अहिल्यानगर-४१३२०५.	सहाय्यक गटविकास अधिकारी, पंचायत समिती जामखेड, ता.जामखेड, जि.अहिल्यानगर.	गटविकास अधिकारी(उ.श्रे.), पंचायत समिती, जामखेड, ता.जामखेड, जि.अहिलयानगर.

सुनावणी दिनांक-१९/११/२०२५

तक्रारदार यांनी दि.१६/०९/२०२३ रोजीच्या अर्जान्वये, "जनमाहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती जामखेड, ता. जामखेड यांना कलम ६(१) अन्वये माहिती मिळण्यासाठी अर्ज क्रमांक AHZPO/R/२०२३/६०२४७ व AHZPO/R/२०२३/६०२४८ है ऑनलाइन प्रणालीद्वारे दि.११/०६/२०२३ रोजी दाखल केला होता. जनमाहिती अधिकारी यांनी मला अर्ज दाखल केल्यापासून ३० दिवसाच्या आत माहिती उपलब्ध करून दिली नाही म्हणून कलम १९ (१) अन्वये प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती जामखेड, ता. जामखेड यांच्याकडे दि.२०/०७/२०२३ रोजी ऑनलाइन प्रथम अपिल दाखल केले होते. कसुरदार जनमाहिती अधिकारी हे सद्यस्थितीला माहिती न देण्याचा पवित्रा ठेऊन आहेत तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी जनमाहिती अधिकारी यांना पाठीशी घालण्याच्या दुष्ट हेतूने प्रथम अपिल अर्जाची सुनावणी घेतली नाही. माहिती अधिकार अधिनियम २००५ कलम १९(८-क) चे उल्लंघन केले आहे. महाराष्ट्र राज्य माहिती आयोग परिपत्रक. मुमाआ २०१९/ प्र.क्र.५०/०१ दि. २५ जून २०१९ निर्णयाचे पालन करण्यात आले नाही. त्यामुळे ते सुद्धा शास्तीस पात्र असून त्यांच्यावरही माहितीचा अधिकार अधिनियम कलम १९ (८) (ग) नुसार दंड व कलम २०(१) (२) नुसार शिस्तभंगाची कार्यवाही होणे आवश्यक आहे. तसेच त्यांचेवर महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांचे बदल्यांचे विनिमय आणि शासकीय कर्तव्य पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ व दफ्तर दिरंगाई कायदा २००६ व लागू असलेल्या अन्य कोणत्याही संबंधित शिस्तभंग विषयक नियमांमध्ये शिस्तभंगाची व दंडात्मक स्वरुपाची कारवाईची शिफारस करावी. सोबत अपिलार्थीस झालेल्या आर्थिक व मानसिक त्रासाबद्दल त्यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(८) (ख) नुसार रुपये २५०००/- (पंचवीस हजार) नुकसान भरपाई देण्यात यावी अशी नम्र विनंती आहे. महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्र.प्र क्र२००९ अ.अ.मा.७३ समन्वय कक्ष मंत्रालय मुंबई ३२ दि ऑगस्ट १०. च्या परिपत्रकामधील मुद्दा ६ नुसार व शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०१५/प्र.क्र.(२३६/१५) सहा. संदर्भान्वये संबंधित विभागाला आदेश देऊन मी मागीतलेली माहिती मला माहिती अधिकार लोगोसहित साक्षांकित करुन देण्यात यावी, ही नम्र विनंती." असे नमूद करुन माहितीचा अधिकार अधिनियमांतील कलम १८(१) अंतर्गत आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे.

२. सदर तक्रार अर्जाच्या अनुषंगाने दि.१९/११/२०२५ रोजी आयोगासमोर आयोजित सुनावणीसाठी- विद्यमान व तत्कालीन जन माहिती अधिकारी अनुपस्थित असून, तक्रारदार उपस्थित होते.

३. तक्रारदार यांनी त्यांच्या दि.११/०६/२०२३ रोजीच्या ऑनलाईन माहिती अर्जान्वये, जन माहिती अधिकारी यांचेकडे जानेवारी २०२१ ते माहिती मिळेपर्यंत या कालावधीतील खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

"अरुण बाबू साठे, रा. नान्नज यांना रोजगार हमी योजनेंतर्गत मंजूर झालेल्या विहीरी संदर्भात माहितीचा तपशील. १) अरुण बाबू साठे, रा. नान्नज, ता. जामखेड यांना वैयक्तिक सिंचन विहीर मंजूर होऊन ५ महिने ईतका कालावधी उलटूनही अद्यापपर्यंत त्यांच्या विहीरीला प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली नाही. कशामुळे देण्यात येत

नाही याचा तपशील, २) अरुण बाबू साठे हे वैयक्तिक सिंचन विहीरीसाठी सन २०२२ व २०२३ या आर्थिक वर्षात पात्र लाभार्थी असून त्यांना विहिर खोदण्यासाठी व त्यांना सिंचन विहीरीच्या हफ्त्यापासून कोण वंचीत ठेवत आहे त्या अधिकाऱ्याचा तपशील देण्यात यावा. ३) अरुण बाबू साठे रा. नान्नज ता. जामखेड यांच्या सोबत ईतर पात्र लाभार्थ्यांच्या विहिरी पुर्ण होऊन त्यांना पुर्णत्वाचे दाखलेही देण्यात आलेले आहेत. मग अरुण बाबू साठे यांनाच कोणत्या कारणामुळे लाभापासून जाणीवपूर्वक दुर ठेवण्यात येत आहे. ४) सन २०२२ ते २०२३ या आर्थिक वर्षात अरुण बाबू साठे हे एकमेव अनुसूचित जाती या प्रवर्गातून पात्र लाभार्थी असल्यामुळे त्यांना जाणीवपूर्वक वंचीत ठेवण्यात येत आहे का याची माहीती देण्यात यावी. ५) अरुण बाबू साठे रा. नान्नज ता. जामखेड हे अनुसूचित जातीचे लाभार्थी आहेत म्हणून कोणी अधिकारी यांना जाणीवपूर्वक वैयक्तिक सिंचन विहीर रोजगार हमी योजनेंतर्गत पात्र होऊनही लाभापासून दुर ठेवण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करत असतील, याचा तपशील."

४. तक्रारदार यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने माहिती न मिळाल्याने प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी उ.श्रे.,पंचायत समिती, जामखेड यांचेकडे दाखल केलेला होता. सदर प्रथम अर्ज प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि.१०/०८/२०२३ अन्वये खालीलप्रमाणे आदेश पारीत करुन निकाली काढलेला आहे.

"अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती ही मानीव जन माहिती अधिकारी तथा रोजगार हमी योजना विभाग, पं.स.जामखेड स्तरावर उपलब्ध असलेली माहिती मोफत सात दिवसात उपलब्ध करुन द्यावी."

५. सुनावणीपूर्वी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१७/१०/२०२३ अन्वये अहवाल सादर केला असून त्यामध्ये असे नमूद केले आहे की, श्री.महादेव अरुण साठे, रा.नान्नज, ता.जामखेड यांचा दि.२४/७/२०२३ अन्वये ऑनलाईन दाखल केलेला माहिती अर्ज जनमाहिती अधिकारी तथा एम.आर.जी.एस विभाग, पंचायत समिती, जामखेड यांचेकडे दि.२५/०७/२०२३ सादर केला होता. यांनी माहिती विहीत मुदतीत न दिल्यामुळे प्रथम अपिल अर्ज दि. २६/०७/२०२३ या कार्यालयात सादर केले आहे. अपील सुनावणी दि १०/८/२०२३ घेणेत आली आहे. पण अपीलार्थी हे सुनावणीस हजर राहीले नाहीत. प्रथम अपील अधिकारी, यांनी असा आदेश दिला की, अपीलार्थी यांना प्रपत्र अ मध्ये मागितलेली माहिती सात दिवसात उपलब्ध करून देण्यात यावी. अपीलार्थी श्री. महादेव अरुण साठे, रा.नान्नज ता. जामखेड यांना जनमाहिती अधिकारी तथा, एम.आर. जी.एस विभाग पंचायत समिती जामखेड यांनी सदर अर्जातील माहिती दि.१४/०८/२०२३ पत्र व विस्तार अधिकारी यांचा पाहणी अहवाल व आदेश यांनी सदर केलेली आहे, असा अहवाल सादर केला आहे. त्याची प्रत सोबत सादर केली आहे.

६. सुनावणी दरम्यानचा युक्तिवाद व प्रस्तूत नस्तीवरील उपलब्ध कागदपत्रे विचारात घेता, तक्रारदार यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे सादर केलेला प्रथम अपिल अर्ज तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, जामखेड, यांनी दि.१०/०८/२०२३ रोजी सुनावणी घेऊन आदेश पारीत करुन निकाली काढल्याचे दिसून येते. प्रथम अपिल आदेशानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जामखेड यांनी वस्तुस्थितीदर्शक उत्तर/उपलब्ध माहिती तक्रारदार यांना दिनांक १०/०८/२०२३ अन्वये पुरविल्याचे दिसून येते. प्रथम अपिल आदेशानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही केल्याचे व तक्रारदार यांना माहिती पुरविली असल्याचे दिसून येते. त्यामुळे तक्रारदार यांच्या तक्रारीत कोणतेही तथ्य नसल्याने सदर तक्रार पुढील चौकशीयोग्य नाही.

तसेच,मा.सर्वोच्च न्यायालयाच्या खालील नमूद आदेशाप्रमाणे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८(१) अंतर्गत तक्रारीमध्ये थेट माहिती देण्याचे आदेश पारीत करता येत नाही.

In the case of Chief Information Commissioner –Vs- State of Manipur (AIR 2012 SC 864), the Hon'ble Supreme Court has observed that a complaint under Section 18 of the Right to Information Act, 2005, could not be treated as appeal under Section 19 and, therefore Information Commissioner while entertaining a complaint under Section 18 of the said Act has no jurisdication to pass an order providing for access to information.

मा.सर्वोच्च न्यायालयाच्या उक्त आदेशानुसार तक्रारीत माहिती देण्याचे आदेश पारीत होत नाही. त्यामुळे तक्रारकर्ता यांनी तक्रारअर्जान्वये केलेली माहिती देण्याची विनंती मान्य करता येत नाही.सबब, प्रस्तूत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

प्रस्तूत तक्रार क्र.५९७/२०२३/अहिल्यानगर निकाली काढण्यात येत आहे.

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक

जावक क्र. २७१९ दिनांक:- 02 APR 2026